# विचित्र चित्रकार

हिरवेगार शेत, सुगंध देणारे सुन्दर उपवन, रंग-बिरंगे पशु-पक्षी धबधबे-झरे, आकाशाला हाल लावणो ऊँच-ऊँच पर्वत, अनेक रत्नांना -मोत्यांना आपल्या गर्भात ङ्घेवलेले खोल सागर, जमीनीवर खळ-खळ करणाऱ्या नद्या, वेगवेगळे रंगरुप आकार चेहऱ्यांची ङ्घेवण असलेले, वेग-वेगळे धर्म, संस्कृती, आणि सभ्यता, नृत्य, गायन व मनोरंजन, वेग-वेगळया पद्धती वेगवेगळे लोक, रिती परम्परा विचार व्यक्ती करण्यासाङ्गी चेहऱ्याचे केलेले वेगवेगळे आकार आणि आकृत्या एवढे चित्र आणि चरित्र बनवणारा शेवटी कोन? हा प्रश्न मानव मनाला भेदून जातो. कवि हृदय म्हणतो की शुन्य भिती पर चित्त रंग नही, तनु बिन लिखा चितेरे। म्हणजे हे संपुर्ण संसार एका शुन्यातुन निर्माण झालेले आहे आणि या शुन्याच्या भितिवर कोणताच रंग आणि लेखनी न वापरता अशरिरी आणि निराकार, परमचित्रकार परमात्माने नाना विधी चित्र बनवले आहे. ज्याच्या सौदर्याचे वर्णन करणे कोणत्याच मनुष्याच्या हातातली गोष्ट नाही. त्या विचित्र चित्रकाराचे वर्णन कवि केशव या शब्दात करतात-

केशव कहि न जाई का कहिए,

देखत तव महिमा विचित्र अति,

मसुझि मनहि मन रहिए।

म्हणजे हे अनंत गुणांचे सागर परमात्मा तुझ्या अनंत कलेचे आणि विचित्रतेचे वर्णन मी नाही करु शकत, त्यामुळे तुझ्या या कौतुकाला पाहून आणि त्याचे वर्णन मनातल्या मनात करत आनंदित होत राहतो.

हे तर सत्य आहे की अपरिमेय सामर्थ असलेल्या परमात्म्याच्या रुपाला आकृती समजुन त्याला एका सिमेमध्ये बांधणे अतिचेष्टा होईल. त्यामुळे ईश्वरा विषयी असे म्हटले आहे की - उसके गुणों की व्याख्या सागर की सयाही व जंगल की कलम बनाकर, पृथ्वी रुपी कागज पर, अगर स्वंय सरस्वती भी बैङ्कर लिखे, तो भी नहीं लिख सकती। तरी पण ज्ञान आणि विज्ञानाच्या नियमानुसार कोणत्या सत्तेचे अस्तीत्व आहे. त्याचे रुप, आकार आणि

चित्र असणे आवश्यक आहे.  अतः विचित्र परमात्मा स्वतः कलयुगाच्या शेवटी ब्रम्हाच्या शरीरात अवतरित होऊन स्वतःच्या चित्र आणि चरित्र्याचा परिचय देतात.  त्यानुसार त्याचे रुप अतिसुक्ष्म ज्योतिर्बिंदु व निराकार आहे. ते सृष्टीचे कल्याणकर्ता आणि सृष्टीकर्ता आहेत.  शंति, प्रेम, आनंद पवित्रता, ज्ञान इ. अनंत गुण आणि शक्तींनी सम्पन्न आहे. तेच संसारातल्या प्रत्येक मनुष्याचे चित्र आणि चरित्र यांची निर्मीती करतात आणि सृष्टीच्या महापरिवर्तनाच्या वेळेस जगाचा पुनुरुध्दार करतात.  विचित्र परमात्म्याचे हेच रहस्यमयी संसार आहे.  ते रुपाने बिंदु आणि गुणाने सिन्धु समान आहेत.

ज्याप्रमाणे सृष्टीकर्ता परमपिता विचीत्र अर्थात निराकार आहे त्याचप्रमाणे त्याची रचना प्रत्येक मनुष्य आत्मा निराकार आणि विचित्र आहे.  जेव्हा मनुष्य स्वतःला आत्मा निश्चय करतो आणि परमात्म्याच्या कर्तव्याला बुद्धी ने समजुन त्याचे स्मरण करतो.  त्यांच्याशी संबंध प्रस्थापित करतो तेव्हा त्याचे चिंतन, कर्म आणि जिवनशैली ही दिव्य आणि श्रेष्ठ होऊन जाते.

अशाप्रकारे विचित्र परमात्म्याच्या ज्ञानाने प्रत्येक मानव श्रेष्ठ चरित्र निर्माण करु शकतो.  नरा पासुन नारायण, नारी पासुन लक्ष्मी सारो बनु शकतो.  हेच विचित्र परमात्माचे विचित्र ज्ञान आहे.  या देवी-देवतांचा सुंदर चेहरा आणि मुर्ती पाहून, भक्तांनी आणि संतांनी म्हटले आहे कि तुझे देखकर जग वाले, यकी नही क्यूँ कर होगा, जिसकी रचना इतनी सुन्दर, वो कितना सुन्दर होगा|

आणि शेवटी हया प्रश्नाचे सविस्तर उत्तर मिळाल्यानंतरच आपण आपले मन-बुध्दी त्या परम आत्म्यावर परमेश्वरावर एकाग्र करु शकतो.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com